# खासदार चंद्रकांत खैरे यांच्या वाढदिवसानिमित्त 'खासदार चषक' क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

**प्रतिनिधी / ३१ डिसेंबर**

**औरंगाबाद :** आज खासदार चंद्रकांत खैरे यांच्या वाढदिवसानिमित्त शहरात मराठवाडा सांस्कृतिक क्रिडामंडळ मैदानावर राज्यस्तरीय 'खासदास चषक' क्रिकेट स्पर्धेचे आयोजन शिवसैनिकांतर्फे करण्यात आले आहे.

शहरात खासदार खैरे यांच्या वाढदिवसानिमित्त अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये तरुण क्रिकेट खेळाडूंना त्यांच्या करिअरला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच, यातुन उत्तम खेळाडू घडवण्यासाठी शिवसैनिकांतर्फे खासदार चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या राज्यस्तरीय 'खासदास चषक' क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन आज सकाळी १० वाजता मराठवाडा सांस्कृतिक क्रिडामंडळ मैदान येथे जिल्हाप्रमुख अंबादास दानवे व महानगरप्रमुख प्रदीप जैस्वाल यांच्या हस्ते होणार आहे. या स्पर्धेचे प्रथम बक्षीस १ लाख रूपये असून व्दितीय बक्षीस ५१ हजार रूपये ठेवण्यात आले आहे. या राज्यस्तरीय टेनिसबॉल क्रिकेटस्पर्धेत अधिकाधिक संघांनी सहभागी व्हावे असे आवाहन आयोजक जयवंत बंडू ओक, किरण गणोरे, आनंद तांदोळीकर, दिनेश कुंठे, शिवाजी शिंदे, विनोद माने, नितीन मेघावाले यांनी केले आहे. या क्रिकेटस्पर्धेला यशस्वी करण्यासाठी नंदकुमार घोडेले, ऋषीकेश खैरे, सचिन खैरे, पंढरीनाथ गोंदे मार्गदर्शन करीत आहेत.

